| | नवी मुंबई महानगरपालिका | NAVI MUMBAI MUNCIPAL CORPORATION |
|---|---|---|
| | पामबीच जंक्शन, भुखंड क्र.1 सेक्टर.15, सी.बी.डी, बेलापूर नवी मुंबई -400 614 दुरध्वनी क्रमांक :2756 7181 | Palm Beach Junction, Plot No. 1 Sector-15 A, C.B.D., Belapur NAVI MUMBAI - 400 614 |

# नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात कंटेन्मेंट झोन मधील लॉकडाऊन आदेश

**अत्यंत महत्वाचे / तातडीचे**

जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./ 856 /2020.
दिनांक : 01/10/2020

**संदर्भ :**

1) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005.
2) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम,1897 व महाराष्ट्र कोव्हीड-19 उपाययोजना नियम, 2020.
3) महाराष्ट्रशासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन अधिसुचना क्र.कोरोना 2020, प्र.क्र.58/ आरोग्य - 5, दिनांक 13 मार्च, 2020.
4) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र.डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दि.31 मे 2020 रोजीचे आदेश.
5) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./647/2020 दिनांक 26/06/2020.
6) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./650/2020 दिनांक 27/06/2020.
7) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र. डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दि.29 जून 2020 रोजीचे आदेश.
8) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./669/2020 दिनांक 01/07/2020.
9) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./679/2020 दिनांक 06/07/2020.
10) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./695/2020 दिनांक 11/07/2020.
11) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./711/2020 दिनांक 19/07/2020.
12) गृह सचिव, भारत सरकार, आदेश क्र. 40-3/2020-DM-I(A), दिनांक 29/07/2020.
13) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र. डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दि.29 जुलै 2020 रोजीचे आदेश.
14) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./738/2020 दिनांक 31/07/2020.
15) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./771/2020 दिनांक 14/08/2020.
16) गृह सचिव, भारत सरकार, आदेश क्र. 40-3/2020-DM-I(A), दिनांक 29/08/2020.
17) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र. डीएमयू-2020/सीआर-92/DisM-1, दि.31 ऑगस्ट 2020 रोजीचे आदेश.
18 ) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./796/2020 दिनांक 31/08/2020.
19 ) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र. डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दि.30 सप्टेंबर 2020 रोजीचे आदेश.

**ज्याअर्थी,** आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, यांनी कोविड-19 विषाणूचा प्रसार थांबविण्यासाठी दिनांक 30.09.2020 रोजी, मध्यरात्री 12:00 वाजेपर्यंत, उपरोक्त संदर्भिय आदेश क्र.18 अन्वये नमुंमपा कार्यक्षेत्रात कंटेन्मेंट झोनमध्ये लॉकडाऊन जाहीर केला होता.

आणि ज्याअर्थी, मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांनी संदर्भ क्र.19 च्या आदेशान्वये, संपूर्ण राज्यामध्ये दिनांक 31/10/2020 रोजी मध्यरात्री 12:00 वाजेपर्यंत लॉकडाऊन सुरु ठेवण्याचे जाहीर केले आहे.

**त्याअर्थी**, नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हॉटस्पॉट क्षेत्रामधील COVID-19 चा वाढता प्रादुर्भाव पाहता, साथरोग नियंत्रण अधिनियम, 1897 च्या कलम 2 अन्वये, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 च्या सर्व संबंधित तरतूदींसह प्राप्त अधिकारांचा वापर करुन, **मी अभिजीत बांगर, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका या आदेशान्वये परिशिष्ट-अ अन्वये जाहीर केलेल्या हॉटस्पॉट व वेळोवेळी जाहीर केलेल्या कन्टेनमेंट क्षेत्रामध्ये दिनांक 31/10/2020 रोजी, मध्यरात्री 12:00 वाजेपर्यंत लॉकडाऊन सुरु राहील, असे जाहीर करीत आहे.**

हॉटस्पॉट, कन्टेनमेंट क्षेत्राव्यतिरिक्त संपूर्ण शहरामध्ये राज्य शासनाने दिनांक 30/09/2020 रोजीचे उपरोक्त संदर्भ क्र. 19 च्या आदेशान्वये जाहीर केल्याप्रमाणे **MISSION BEGIN AGAIN** सुरु राहील. यामध्ये नागरिकांनी खालील सूचनांचे पालन करणे अनिवार्य राहील.

1. सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी आणि प्रवास करताना मास्क वापरणे बंधनकारक राहील.
2. सार्वजनिक ठिकाणी दोन व्यक्तींमध्ये किमान 6 फूटाचे सुरक्षित अंतर राहील याबाबत नागरिकांनी काटेकोरपणे दक्षता घ्यावी. दुकानदारांनी ग्राहक सोशल डिस्टन्सींगचे पालन करतील, याची दक्षता घ्यावी. आणि एका वेळेस 5 पेक्षा जास्त व्यक्ती दुकानासमोर राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.
3. मोठे सार्वजनिक व खाजगी समारंभ अनुज्ञेय नाहीत. लग्नकार्याशी संबंधीत बाबींकरीता 50 पेक्षा जास्त व्यक्ती एकत्रित जमणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. अंत्यविधी करीता 20 जणांपेक्षा जास्त व्यक्तींची उपस्थिती असता कामा नये.
4. सार्वजनिक ठिकाणी थुंकल्याचे निदर्शनास आल्यास महानगरपालिकेमार्फत दंड आकारण्यात येईल.
5. सार्वजनिक ठिकाणी दारु, पान, गुटखा, तंबाखू इत्यादींचे सेवन करण्यास सक्त मनाई आहे.
6. नागरिकांनी जास्तीत जास्त 'वर्क फ्रॉम होम (Work From Home)' पध्दतीने काम करावे. खाजगी आस्थापनांनी त्या पध्दतीने कामाचे नियोजन करावे.
7. कामाच्या ठिकाणी थर्मल स्क्रिनींग, हात धुण्याची व्यवस्था, सॅनिटाईजरची व्यवस्था प्रवेशव्दार व बाहेर पडण्याच्या मार्गावर तसेच इतर आवश्यक ठिकाणी उपलब्ध राहील याबाबत दक्षता घ्यावी.

8. कार्यालयातील कामकाजाची ठिकाणे वेळोवेळी निर्जंतुकीकरण करण्यात यावीत. (दरवाजे, हॅन्डल, रेलींग, जीने, टेबल, खुर्च्या, संगणक इ.)
9. कामाच्या ठिकाणी तसेच जेवणाच्या सुट्टीमध्ये दोन कर्मचाऱ्यांमध्ये सामाजिक अंतर राहील याची प्रामुख्याने दक्षता घेण्यात यावी.

**1. प्रतिबंधित क्षेत्र (CONTAINMENT ZONES) :-**

I. महाराष्ट्र शासनाच्या दिनांक 19/05/2020 व 21/05/2020 रोजीच्या आदेशान्वये वर्गीकरण करण्यात आलेली प्रतिबंधित क्षेत्रे पुढील आदेश होईपर्यंत कायम राहतील.

II. प्रतिबंधित क्षेत्राकरीता केंद्र सरकार व महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी जारी केलेले आदेश अंमलात राहतील.

III. स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन महापालिका आयुक्तांनी प्रतिबंधित क्षेत्राबाबत जारी केलेले आदेश अंमलात राहतील.

**2. राज्यभरात तसेच महापालिका क्षेत्रात प्रतिबंधित असलेल्या बाबी :-**

1) शाळा, कॉलेज, शैक्षणिक संस्था आणि कोचींग इन्स्टिटयुट इ. दिनांक 31/10/2020 रोजी पर्यंत बंद राहतील मात्र ऑनलाईन / डिस्टन्स लर्निंग अभ्यासक्रम सुरु ठेवता येतील आणि त्यास प्रोत्साहन देता येईल.

2) सिनेमागृहे, तरणतलाव, मनोरंजक उदयाने, थिएटर्स (मॉल आणि वाणिज्य संकुलांमधील थिएटर्ससह), ऑडिटोरियम, असेम्ब्ली हॉल आणि त्यासारखी स्थळे इत्यादी बंद राहतील.

3) केंद्रीय गृह विभागाच्या मान्यतेखेरीज आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतूक बंद राहील.

4) मेट्रो रेल्वे सेवा बंद राहील.

5) सामाजिक / राजकीय / क्रीडा / मनोरंजन / शैक्षणिक / सांस्कृतिक / धार्मिक कार्यक्रम आणि इतर मोठे सामुहिक कार्यक्रमास परवानगी अनुज्ञेय नाही.

**3. सर्व अत्यावश्यक वस्तुंची दुकाने यापुर्वीच्या आदेशानुसार सुरु राहतील.**

4. यापूर्वीच्या आदेशाने वेळोवेळी परवानगी देण्यात आलेल्या बाबी सुरु राहतील आणि यापूर्वीचे सर्व आदेश या आदेशाशी सलग्न राहतील व दिनांक 31/10/2020 पर्यंत लागू राहतील.

**5. खालील निम्नदर्शित बाबी अनुज्ञेय राहतील.**

I. हॉटेल / फुडकोर्ट / रेस्टॉरंट व बार यांना 05/10/2020 पासून 50% क्षमतेने सुरु करण्याची परवानगी अनुज्ञेय राहील. सदर आस्थापना सुरु ठेवण्याकरीता पर्यटन विभागाकडून स्वतंत्ररित्या प्रमाण कार्यप्रणाली (SOP) निर्गमित केली जाईल.

II. नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील सर्व औद्योगिक आणि उत्पादक युनिट्समध्ये अत्यावश्यक वस्तुंसह इतर वस्तुंचे (non-essential) उत्पादन सुरु करण्यासाठी परवानगी असेल.

6. ऑक्सिजनची वाहतूक करणाऱ्या वाहनांना संपूर्ण राज्य व राज्याबाहेर पूर्णवेळ वाहतुक करण्याची परवानगी असेल. ऑक्सिजनचे उत्पादक आणि पुरवठादार यांच्यावर वाहतुकीचे कोणतेही प्रतिबंध राहणार नाहीत. सर्व संबंधित सक्षम प्राधिकरणांनी याची नोंद घ्यावी.

7. या व्यतिरिक्त विशिष्ट आदेशाव्दारे संबंधित प्राधिकरणांनी परवानगी दिलेली कामे करता येतील.

उक्त कालावधीतील लॉकडाऊनचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती / संस्था यांचेवर साथरोग अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 51 ते 60 अन्वये तसेच, भारतीय दंड संहिता यामधील कलम 188 अन्वये कारवाई केली जाईल.

**सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.**

01/10/2020

**( अभिजीत बांगर )**
**आयुक्त**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**प्रत :**

1. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
2. मा. पालकमंत्री ठाणे तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
3. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य. अधिकारी.
4. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
5. मा. पोलीसआयुक्त, नवीमुंबई.
6. जिल्हाधिकारी, ठाणे.
7. अतिरिक्त आयुक्त -1 आणि 2 नमुंमपा.
8. उप आयुक्त (मुख्यालय) आणि उप आयुक्त- परिमंडळ 1 व 2, नमुंमपा.
9. वैदयकिय आरोग्य अधिकारी, नमुंमपा.
10. सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी (सर्व 8 विभाग कार्यालय), नमुंमपा.

# परिशिष्ठ - अ

## नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कंटेन्टमेंट झोन

| |
|---|
| **विभागाचे नाव : बेलापूर विभागातील कार्यक्षेत्र (कंटेन्टमेंट झोन - त्रिमुर्ती सदन दारावे गाव बेलापूर)** |
| **कंटेन्टमेंट झोन असलेल्या क्षेत्राच्या चर्तु:सिमा** |
| उत्तर :- गंगोत्री संगम सोसायटी |
| दक्षिण :- हेमकुंट सोसायटी |
| पूर्व :- तिरुपती टॉवर भु.क्र.90 |
| पश्चिम :- श्रीनाथ सदन |

| |
|---|
| **विभागाचे नाव : बेलापूर विभागातील कार्यक्षेत्र (कंटेन्टमेंट झोन - विशाल प्राईड, प्लॉट नं 59, सेक्टर 50 नविन)** |
| **कंटेन्टमेंट झोन असलेल्या क्षेत्राच्या चर्तु:सिमा** |
| उत्तर :- रुक्मीणी छाया |
| दक्षिण :- ओम श्री विनायक सोसायटी |
| पूर्व :- श्री ओम सदगुरु |
| पश्चिम :- शिव शंकर गॅलक्सी |

| |
|---|
| **विभागाचे नाव : नेरुळ विभागातील कार्यक्षेत्र (कंटेन्टमेंट झोन - दिपसागर हौ.सो. भुखंड क्र.25, से.19 नेरुळ)** |
| **कंटेन्टमेंट झोन असलेल्या क्षेत्राच्या चर्तु:सिमा** |
| उत्तर :- विसावा भुखंड क्र.24, सेक्टर-19 |
| दक्षिण :- ग्रिन व्हॅली भुखंड क्र.26, सेक्टर -19 |
| पूर्व :- गलीलीयन सोसायटी. भुखंड क्र. 28, सेक्टर -19 |
| पश्चिम :- रस्ता |

| |
|---|
| **विभागाचे नाव : नेरुळ विभागातील कार्यक्षेत्र (कंटेन्टमेंट झोन - घर क्र. 758, से-20, नेरुळ गाव)** |
| **कंटेन्टमेंट झोन असलेल्या क्षेत्राच्या चर्तु:सिमा** |
| उत्तर :- श्री. तुकाराम कडू यांचे घर |
| दक्षिण :- श्री. पदमाकर भोपी यांचे घर |
| पूर्व :- घर क्र. 754 |
| पश्चिम :- घर क्र. 760 |

| **विभागाचे नाव : नेरुळ विभागातील कार्यक्षेत्र (शिवशक्ती अपार्टमेंट, 94 / 7, से- 10, नेरुळ)** |
|---|
| **कंटेन्टमेंट झोन असलेल्या क्षेत्राच्या चर्तु:सिमा** |
| उत्तर :- 94 / 8, शिवशक्ती अपार्टमेंट |
| दक्षिण :- 94 / 6, शिवशक्ती अपार्टमेंट |
| पूर्व :- 93, शिवशक्ती अपार्टमेंट |
| पश्चिम :- मोकळी जागा |

| **विभागाचे नाव : वाशी विभागातील कार्यक्षेत्र (कंटेन्टमेंट झोन - वाशी गाव से.31 प्लॉट लाईन शिवतर टॉवर)** |
|---|
| **कंटेन्टमेंट झोन असलेल्या क्षेत्राच्या चर्तु:सिमा** |
| उत्तर :- सिडको वसाहत झोपडी |
| दक्षिण :- मारुती प्रसाद |
| पूर्व :- सदगुरु कृपा |
| पश्चिम :- नाला झोपडी |

| **विभागाचे नाव : वाशी विभागातील कार्यक्षेत्र (कंटेन्टमेंट झोन - प्रार्थना प्लॉट नं. 48, से.28)** |
|---|
| **कंटेन्टमेंट झोन असलेल्या क्षेत्राच्या चर्तु:सिमा** |
| उत्तर :- भुखंड क्र. 47 |
| दक्षिण :- भुखंड क्र. 53 |
| पूर्व :- सरदार वल्लभभाई उद्यान |
| पश्चिम :- भुखंड क्र. 49 |

| **विभागाचे नाव : तुर्भे विभागातील कार्यक्षेत्र (महावीर अमृत सोसायटी, भु.क्र.2, से.19, सानपाडा)** |
|---|
| **कंटेन्टमेंट झोन असलेल्या क्षेत्राच्या चर्तु:सिमा** |
| उत्तर :- फुलस्टॉप मॉल, भु.क्र.1, से.19, सानपाडा. |
| दक्षिण :- क्षितीज बिल्डिंग, भु.क्र.3, से.19, सानपाडा. |
| पुर्व :- सिडको मोकळा भुखंड, से.19, सानपाडा. |
| पश्चिम :- पामबीच सर्विस रोड, से.19, सानपाडा. |

| | |
|---|---|
| **विभागाचे नाव : तुर्भे विभागातील कार्यक्षेत्र (निवारा सोसायटी, से.3, सानपाडा)** | |
| **कंटेन्टमेंट झोन असलेल्या क्षेत्राच्या चर्तु:सिमा** | |
| उत्तर :- सानपाडा रेल्वे स्टेशन. | |
| दक्षिण :- ओरीएन्टल कॉलेज, से.3, सानपाडा. | |
| पुर्व :- स्नेहबंधन सोसायटी, से.3, सानपाडा. | |
| पश्चिम :- सिडको पार्किंग रेल्वे स्थानक जवळ, सानपाडा. | |

| | |
|---|---|
| **विभागाचे नाव : ऐरोली विभागातील कार्यक्षेत्र (कंटेन्टमेंट झोन - ओमकार सोसायटी, सेक्टर 10, ऐरोली )** | |
| **कंटेन्टमेंट झोन असलेल्या क्षेत्राच्या चर्तु:सिमा** | |
| उत्तर :- ब्रिजव्ह्यु सोसायटी, से 10 | |
| दक्षिण :- डॉ. आंबेडकर उद्यान | |
| पूर्व :- चायना गार्डन | |
| पश्चिम :- 11.0 मीटर रुंदीचा रस्ता | |

| | |
|---|---|
| **विभागाचे नाव : दिघा विभागातील कार्यक्षेत्र (कंटेन्टमेंट झोन - दत्तकृपा (अनभुले निवास) अपार्टमेंट ) बिंदुमाधव नगर, दिघा** | |
| **कंटेन्टमेंट झोन असलेल्या क्षेत्राच्या चर्तु:सिमा** | |
| उत्तर :- सुदाम अपार्टमेंट | |
| दक्षिण :- ओमसाई अपार्टमेंट | |
| पूर्व :- शिवभवन सोसायटी | |
| पश्चिम :- महात्मा हिंदी हायस्कुल, बिंदुमाधवनगर STP शेड | |

01/08/2020

**( अभिजीत बांगर )**
**आयुक्त,**
**नवी मुंबई महानगरपालिका**